।। असाध्य ते साध्य करिता सायास ।।

कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे



# नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँण्ड कॉमर्स, कोल्हापूर

आयोजित

# देशभक्त पद्मश्री रत्नाप्पाण्णा कुंभार राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन

# वक्तृत्व स्पर्धा २०२६

वर्ष दुसरे

**शनिवार, दि. १२ सप्टेंबर, २०२६**

## वाणीरत्न चषक

थोर स्वातंत्र्यसेनानी, देशभक्त, पद्मश्री डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार हे स्वातंत्र्यलढा आणि स्वातंत्र्योत्तर भारताच्या जडणघडणीतील एक अत्यंत महत्त्वाचे लोकनेते होते. स्वातंत्र्यचळवळीतील क्रांतिकारी लढ्याचे व संस्थाने विलीनीकरणाचे नेतृत्व करणाऱ्या देशभक्त रत्नाप्पाण्णांनी भारतीय संविधान सभेचे सदस्य म्हणून काम केले. स्वातंत्र्योत्तर काळात राजकारण, समाजकारण, सहकार, ग्रामीण कृषी अर्थकारण, औद्योगीकीकरण, शिक्षण अशा अनेक क्षेत्रात त्यांनी उत्तुंग कार्य करून स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी कौन्सिल ऑफ एज्युकेशनची १९५१ साली स्थापना करून शिक्षणातून समाजपरिवर्तनाचा यशस्वी प्रयोग केला. आज कौन्सिल ऑफ एज्युकेशनची शहाजी लॉ कॉलेज, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, नाइट कॉलेज व पार्वतीदेवी कुंभार कॉलेज ऑफ नर्सिंग ही महाविद्यालये पायाभूत शैक्षणिक सुविधांसह दर्जेदार शिक्षण देणारी महाराष्ट्रातील नामांकित महाविद्यालये आहेत.

देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार यांनी १९७१ साली नाइट कॉलेजची स्थापना करून प्रतिकूल परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या घटकांना दर्जेदार उच्चशिक्षण देऊन त्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्याचे महान कार्य केले. आज नाइट कॉलेजमध्ये कला आणि वाणिज्य विद्याशाखेमध्ये कनिष्ठ, पदवी व पदव्युत्तर (मराठी, इंग्रजी) स्तरावरील शिक्षण दिले जाते. राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद (नॅक) बेंगलोर यांच्याकडून कॉलेजला 'अ' (CGPA 3.12) मानांकन प्राप्त झाले आहे. शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक आदी क्षेत्रात कॉलेज देदिप्यमान कामगिरी करीत आहे.

देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार हे स्वतः एक उत्कृष्ट वक्ते होते. त्यांची भाषणे देशकालपरिस्थितीचे समग्र आकलन मांडणारी, अभ्यासपूर्ण, मुद्देसूद, विचारगर्भ, भविष्यवेधी, लोकमानसाला भिडणारी असत. स्वातंत्र्यलढ्याचा मूल्यात्मक वारसा, व्यापक जीवनानुभव, कृतिशील सामाजिक बांधिलकी, चौफेर वाचन व्यासंग, सूक्ष्म निरीक्षण, चिंतन, भाषाप्रभुत्व अशा अनेक बाबींमधून त्यांचे वक्तृत्व घडले होते. स्वातंत्र्यलढा व सामाजिक चळवळींमधून आकारास आलेली भारतविषयक संकल्पना,

संविधानिक मूल्ये, गांधीवाद, पुरोगामी विचार, सामाजिक जाणिवा या त्यांच्या विचारवारशाला केंद्रस्थानी ठेवून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधून चिकित्सक विचार व अभ्यासपूर्ण मांडणी करणारे वक्ते घडावेत, या उद्देशाने आम्ही देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करीत आहोत.

## स्पर्धेचे विषय

१. देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे जीवनकार्य आणि विचार
२. भारताची संकल्पना (आयडिया ऑफ इंडिया) : स्वरूप व आव्हान
३. न्यायसंस्था : संविधानिक दायित्व आणि वास्तव
४. शिक्षणव्यवस्था ज्ञाननिर्मितीक्षम व रोजगाराभिमुख कशी होईल?
५. स्त्रियांचे आरोग्य : जागरुकतेचा अभाव की व्यवस्थात्मक दुय्यमत्व?
६. 'जेन झी' च्या अंतरंगात......
७. विषारी आणि भेसळयुक्त आहार : जीवघेणे संकट

**वेळ**
८ मिनिटे (६+२ मि.)
**प्रवेश शुल्क**
**रु. २००/-**




## पारितोषिके




**प्रथम क्रमांक**
**रु १०,०००/-**
कै. ॲड. टी. डी. बाडकर पारितोषिक

**द्वितीय क्रमांक**
**रु ७,५००/-**
मा. चंद्रशेखर डोली, मयुरा स्टील्स पारितोषिक

**तृतीय क्रमांक**
**रु ५,०००/-**
शा. कृ. पंत वालावलकर पारितोषिक

**चतुर्थ क्रमांक**
**रु ३,०००/-**
ॲड.दीपलक्ष्मी वैभव पेडणेकर पारितोषिक

**पंचम क्रमांक**
**रु २,०००/-**
ॲड.के.एस.गुंडपाटील पारितोषिक

**उत्तेजनार्थ**
प्रथम रु : १५००/- । द्वितीय रु : १०००/-
माजी विद्यार्थी संघ, नाइट कॉलेज, कोल्हापूर पारितोषिक

**स्पर्धेचे नियम :**

१. स्पर्धा मराठी माध्यमातून व तयारीची आहे. स्पर्धेसाठी दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर स्पर्धक मांडणी करू शकतील.
२. स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्यामधील मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये (ज्युनिअर कॉलेज), वरिष्ठ महाविद्यालये आणि विद्यापीठ अधिविभागांमध्ये कोणत्याही विद्याशाखेमध्ये प्रवेश घेतलेले विद्यार्थी सहभागी होऊ शकतात.
३. एका महाविद्यालयातील/विद्यापीठातील अधिविभागनिहाय जास्तीत जास्त दोन विदयार्थी सहभागी होऊ शकतील.
४. स्पर्धकाजवळ मा. प्राचार्यांचे/विद्यापीठ अधिविभाग प्रमुखांचे संमती पत्र व महाविद्यालयीन ओळखपत्र (I-Card) असणे बंधनकारक आहे.
५. स्पर्धकांनी प्रवेशिका आपल्या महाविदयालयाच्या प्राचार्यांच्या/अधिविभाग प्रमुखांच्या मार्फत पाठवाव्यात. परस्पर आलेल्या प्रवेशिका विचारात घेतल्या जाणार नाहीत. स्पर्धेवेळी प्राचार्यांच्या संमती पत्रासह प्रवेशिका नोंदणी कक्षामध्ये जमा करावी.
६. स्पर्धेतील मांडणीचा कालावधी ८ मिनिटे (६+२ मि.) असेल. वेळ समाप्तीनंतर भाषणाचा शेवट करण्यासाठी अधिकचे तीस सेकंद दिले जातील. वेळेची किमान व कमाल मर्यादा न पाळणारे स्पर्धक बाद ठरतील.
७. स्पर्धकांना सांकेतिक क्रमांक दिले जातील. स्पर्धेवेळी स्पर्धकांनी फक्त आपला सांकेतिक क्रमांक सांगावा. इतर कोणत्याही प्रकारे स्वतःची ओळख उघड करू नये.
८. स्पर्धकांची मांडणी स्वतंत्र, अभ्यासपूर्ण, आशयसंपन्न, चिकित्सक, विश्लेषक, तर्कसंगत, मुद्देसूद, अधिकृत, साधार असावी. कोणत्याही प्रकारची नक्कल प्रमाद समजला जाईल.
९. स्पर्धा संपल्यानंतर लगेच निकाल जाहीर केला जाईल. पारितोषिकांचे वितरण १५ सप्टेंबर २०२६ रोजी देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार जयंती समारंभामध्ये होईल. प्रथम क्रमांकाच्या स्पर्धकाचे भाषण त्याप्रसंगी होईल.
१०. स्पर्धकांच्या भोजनाची व्यवस्था केली जाईल. पारितोषिकप्राप्त स्पर्धकांच्या निवासाची व्यवस्था केली जाईल. स्पर्धकांना कोणत्याही प्रकारचा प्रवासखर्च/ भत्ता दिला जाणार नाही .
११. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.
१२. पारितोषिक प्राप्त स्पर्धकांना पारितोषकांची रोख रक्कम, वाणीरत्न चषक आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. इतर सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्रे दिली जातील .
१३. स्पर्धकांनी प्रथम गुगल फॉर्मद्वारे नोंदणी करावी. नोंदणीच्या वेळी प्रवेश शुल्क रु.२००/– ऑनलाईन भरावेत.
१४. नोंदणी शुल्क ऑनलाईन भरल्यानंतर गुगल नोंदणी फॉर्ममध्ये Bank Transaction ID ची नोंद करून पावती अपलोड करावी. तसेच marathinck@gmail.com या मेलवर पाठवावी. नोंदणी शुल्क भरलेली पावती / Screen shot जपून ठेवावा.

## मार्गदर्शक

**मा. सौ. रजनीताई मगदूम**
अध्यक्षा
कौन्सिल ऑफ एज्युकेशन

**मा. डॉ. प्रसाद मगदूम**
उपाध्यक्ष
कौन्सिल ऑफ एज्युकेशन

**मा. डॉ. विश्वनाथ मगदूम**
सचिव
कौन्सिल ऑफ एज्युकेशन

**मा. ॲड. वैभव पेडणेकर**
संचालक
कौन्सिल ऑफ एज्युकेशन

**मा. ॲड. अमित बाडकर**
संचालक
कौन्सिल ऑफ एज्युकेशन

## वक्तृत्व स्पर्धा संयोजन समिती

**प्रा. डॉ. उत्तम पाटील**
प्राचार्य

**प्रा. डॉ. अरुण शिंदे**
स्पर्धा समन्वयक (९४२१०२४०५५)

**सदस्य :** प्रा. डॉ. ए. ए. गावडे, प्रा. दिलीप जाधव (९०४९५६६२४०),
प्रा. डॉ. शंकर पवार, प्रा. डॉ. एमन अत्तार,
प्रा. तेजस गुरव, डॉ. ओंकार कुडाळकर

## नोंदणीसाठी गुगल फॉर्म लिंक

https://forms.gle/inYr549G7Yrosv6r6

## व्हॉटस्ॲप ग्रुप लिंग

https://chat.whatsapp.com/IEzOV9QGf7l6ctOGxnSgdu?s=cl&p=a&ilr=1

## नोंदणी शुल्क खालील बँक खात्यावर ऑनलाईन भरावे.

| | |
|---|---|
| **Bank Accont Name** | Principal,<br>Night College of Arts and Commerce Kolhapur |
| **Bank Name** | Union Bank of India |
| **Branch** | Laxmipuri, Kolhapur |
| **Saving Account Number** | 321402010119323 |
| **IFSC Code** | UBINO532142 |
| **Branch Code** | 532142 |
| **MICR** | 416026002 |

नोंदणी शुल्क भरण्यासाठी
**QR Code**

**नोंदणीचा अंतिम दिनांक ११ सप्टेंबर, २०२६**

**स्पर्धेचे स्थळ :** प्रा. पुष्पा देशपांडे-राशीवडेकर सभागृह, **वेळ :** सकाळी १० वा.
नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स, बिंदू चौक, कोल्हापूर